# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील समर्थ पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- ०६/०२/२०१८

समर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे अरबाज फिरोज खान, वय २४ वर्षे, रा. गोल्डन सिटी बिल्डींग, नाना पेठ पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ०३/२०१८ दिनांक ०६/०२/२०१८ रोजी एक वर्षाकरीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम खून, बेकायदेशिर जमावात सामील होणे, दंगा करणे, समान उदिष्ट साधण्यासाठी बेकायदेशिर जमावात सहभागी होणे, बेकायदेशिर शस्त्र जवळ बाळगणे, खून करण्याचा प्रयत्न, अग्निशस्त्रे व घातक शस्त्र जवळ बाळगणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द कोंढवा आणि समर्थ पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास डॉ. प्रविण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.